बुधवार, ९ मार्च २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २३१
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

संजय राऊतांना किरीट सोमय्यांचे सडेतोड उत्तर/२
मांडला-काकळघर रस्त्यासाठी ग्रामस्थ झाले आक्रमक/५
दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत रायगड संघ विजेता/६

## महाडमध्ये स्फोट; तीन पोलीस गंभीर जखमी



**महाड** : तालुक्यात कांबळे तर्फे महाड गावाजवळ जप्त केलेला जुना विस्फोटक मुद्देमाल नष्ट करीत असताना झालेल्या स्फोटात तीन पोलीस कर्मचारी गंभीर, तर एक किरकोळ जखमी झाला आहे. गंभीर जखमींवर महाड ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून मुंबई येथे हलवण्यात आले आहे. हा मुद्देमाल कांबळे येथील एका दगडखाणीत नष्ट करताना मंगळवारी (दि. ८) स्फोट झाला. यात अलिबाग येथून आलेले राहुल दोशी, रमेश कुटे, आशीर्वाद लगदे असे तीन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत, तर एक पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाला. दरम्यान, या स्फोटाने परिसरातील गावांमध्ये मोठे धक्के बसले. यामुळे गावातील घरेदेखील हादरली असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले.

# महिला दिनी स्त्रीशक्तीला सलाम

## ठिकठिकाणी कार्यक्रम, महिलांचा सन्मान

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

**जागतिक महिला दिन मंगळवारी (दि. ८) सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त विविध आस्थापना, संस्थांच्या वतीने ठिकठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या महिलांना या वेळी सन्मानित केले गेले. एरवी कामात सतत व्यस्त असलेल्या महिलांसाठी मंगळवारचा दिवस वेगळा होता. जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्तीचा सन्मान करणाऱ्या संदेशांचा, शुभेच्छांचा सकाळपासून सोशल मीडियात वर्षाव सुरू होता. त्यामुळे महिलावर्ग भारावून गेल्याचे पहावयास मिळाले.**

### पनवेल महापालिकेतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम

महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल महापालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. महापालिका स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असल्याने या सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम विविधतेत एकता अशी ठेवण्यात आली होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या सिनेअभिनेत्री मधुरा वेलणकर यांच्या हस्ते झाले. या वेळी भारतरत्न स्व. लता मंगेशकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमास महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, महिला बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती सभापती, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिका स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असल्याने या सांस्कृतिक कार्यक्रमाची विविधतेत एकता अशी संकल्पना ठेवण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्रातील विविध लोकपरंपरा, वासुदेव, मंगळागौर, गोंधळ, लावणी, पोवाडा, कोळीगीत, कविता वाचन, सामुदायिक गायन, वेशभूषेच्या माध्यमातून भारताची विविधता दाखवणारे फॅशन शो तसेच भारताच्या जडणघडणीमध्ये ज्या ज्या महान स्त्रियांनी योगदान दिले अशा प्रतिकात्मक महिलांचा फॅशन शो असे विविध कार्यक्रम झाले. **(पान २ वर..)**



### महिला वैमानिक प्राप्ती ठाकूरचा विशेष गौरव



जागतिक महिला दिनी कुंडेवहाळ ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे पनवेल तालुक्यातील पहिली महिला वैमानिक प्राप्ती भरत ठाकूर हिचा विशेष गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे नेत्र तपासणी, आदिवासी बांधवांना चष्मे वाटप व आरोग्य तपासणी असे उपक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमास सत्कारमूर्ती महिला वैमानिक प्राप्ती ठाकूर, पंचायत समिती सदस्य व भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, उपमहापौर सीताताई पाटील, गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रचना शिंदे, माजी नगरसेविका निता माळी, भाजप महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, तालुका सरचिटणीस लीना पाटील, प्रतिभा भोईर, नेरे सरपंच राजश्री म्हसकर, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव वास्कर, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुजाता पाटील यांच्यासह प्राप्ती ठाकूर हिचे वडील भरत ठाकूर, आई रजनी ठाकूर व भाऊ प्रतिक ठाकूर उपस्थित होते. या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. रचना शिंदे यांनी महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा

# पेन ड्राईव्ह बॉम्ब



राज्य सरकारच्या षडयंत्राचे पुरावे सादर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंगळवारी (दि. ८) विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडवणीस यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करीत 'पेन ड्राईव्ह' बॉम्ब टाकला. सरकारच्या षडयंत्राचे पुरावे असल्याचे सांगत फडणवीस यांनी हा पेन ड्राईव्ह विधानसभा अध्यक्षांना सुपूर्द केला.

भाजप आमदार गिरीश महाजन यांच्यावर मोक्का लावण्यासाठी विशेष सरकारी वकिलांनी षडयंत्र रचले होते. त्याला आमच्या पक्षातून सत्ताधारी पक्षात गेलेल्या एका नेत्यानेही मदत केल्याचा धक्कादायक आणि खळबळजनक आरोप विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला. हे षडयंत्र कसे रचले जात होते याचे व्हिडीओ असलेला एक पेन ड्राईव्ह फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्षांकडे दिला तसेच प्रत्येक व्हिडीओत कोण कोण संवाद साधत आहे हेही सांगितले. सरकारी वकिलाने कट कसा प्लांट करायचा, पुरावे कसे तयार करायचे, जबानी कशी नोंदवायची, साक्षीदाराने साक्ष काय द्यायची याची तयारी त्यांनी केल्याचेही फडणवीस यांनी विस्तृतपणे सांगितले.

महाविकास आघाडीतील कारागृहात गेलेल्या नेत्यांबाबतही फडणवीस यांनी या वेळी खुलासा केला. माझ्याकडे सव्वाशे तासांचे रेकॉर्डिंग आहे. आता मी निवडक भाग देतो. यातील काही भाग सभागृहाची इभ्रत घालवणारे आहेत. ते सांगू शकत नाही, असे फडणवीस म्हणाले.

### सरकारी वकील, पोलीस आणि मंत्र्यांचा सहभाग

ही कथा मोठी आहे. त्यावर २५ वेबसीरीज बनतील इतके मोठे मटेरियल आहे. त्याचा व्हिडीओ मी दिला आहे. सरकारी वकिलांचे कार्यालय हे विरोधकांविरोधातील षडयंत्र रचण्याची जागा आहे. चाकू प्लांट करण्यापासून गळ्याला रक्त लावण्यापासून ते ड्रग्जची रेड कशी करायची? हा असा गुन्हेगारी स्वरूपाचा कट वकील रचत आहेत. त्यात पोलीस आणि मंत्रीही आले. हे सर्व कुभांड रचले गेले. एफआयआरदेखील सरकारी वकिलांनी लिहून दिला. साक्षीदार सरकारी वकिलाने दिले. जबानी कशी नोंदवायची हे शिकवले. छापा कसा टाकायचा याची व्यवस्था केली. आमचे एक माजी नेते आता ते तुमच्या पक्षात आहे त्यांनी ही व्यवस्था केली. हॉटेल बुक केली. पैसे कसे द्यायचे हेही ठरले, असा गौप्यस्फोट विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केला.

## निवडक

### सुमीत अडकलेल्या ६९४ भारतीय विद्यार्थ्यांची सुटका

**नवी दिल्ली** : युक्रेनमधील सुमी शहरात अडकलेल्या सर्व ६९४ भारतीय विद्यार्थ्यांना विशेष कॉरिडॉर तयार करून सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी दिली. सुमीमधील सर्व भारतीय विद्यार्थी बसमध्ये बसून पोल्तवासाठी रवाना झाले आहेत, असेही पुरी यांनी सांगितले. त्यामुळे या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांना दिलासा मिळाला आहे.

### कंदहार विमान अपहरणातील दहशतवाद्याची कराचीत हत्या

**कराची** : कंदहार विमान अपहरणात सहभागी असलेला एक दहशतवादी जहूर मिस्त्री याची कराचीत अज्ञात बाइकस्वारांनी गोळ्या झाडून हत्या केली आहे. २५ डिसेंबर १९९९ रोजी एअर इंडियाच्या विमानाचे काठमांडूहून दिल्लीला येत असताना अपहरण झाले होते. या विमानात रूपिन कात्याल हे पत्नीसोबत होते. दहशतवाद्यांनी रूपिन यांची हत्या करून पार्थिव युएई विमानतळावर फेकले होते.

## महाराष्ट्राच्या मातीतील कुस्तीचा सर्वांना अभिमान -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीतील रांगडा खेळ आहे. त्यामुळे सर्वांना कुस्तीचा अभिमान आहे, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते पनवेल तालुक्यातील नितळस येथे बोलत होते.

पनवेल तालुक्यातील नितळस येथे जय हनुमान कुस्तीगिर संघाच्या वतीने रायगड कुस्ती प्रीमियर लीग दोन दिवसीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जांभूळेश्वर मैदानात रंगलेल्या या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. ७) भेट देत आयोजकांचे कौतुक केले.

या कुस्ती स्पर्धेत कर्जतच्या मावळे संघाने प्रथम, तर नेरे गावच्या शूरवीर संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. या संघांना अनुक्रमे एक लाख रुपये व चांदीची गदा आणि ५० हजार रुपये व चांदीची गदा देऊन गौरविण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, राम पाटील, वावंजे विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, नितळसचे सरपंच डी. के. म्हात्रे, उपसरपंच विकास पाटील, कृष्णबुवा पवार, गोपीनाथ पाटील, संतोष गोंधळी, आयोजक पैलवान रूपेश पावशे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

### रायगड कुस्ती प्रीमियर लीगमध्ये कर्जत संघ अव्वल



## मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ

### १४ मार्चपासून न्हावा-शिवडी सी लिंकचे काम बंद पाडण्याचा न्हावा ग्रामस्थांचा इशारा



(छाया : जीवन केणी)

**उरण : प्रतिनिधी**

न्हावा-शिवडी सी लिंक प्रकल्पाचे काम सुमारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झाले असले तरी बाधित असलेल्या न्हावा आणि न्हावाखाडी येथील ७८९ स्थानिक मच्छीमारांना अद्यापही नुकसानभरपाई मिळालेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या या ग्रामस्थांनी येत्या १४ मार्चपासून ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुरू असलेल्या सी लिंक प्रकल्पाचे काम बेमुदत बंद पाडण्याचा निर्वाणीचा इशारा पत्रकार परिषदेतून दिला आहे.

या पत्रकार परिषदेला न्हावा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत भोईर, सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच मंजुषा ठाकूर, सदस्य सागर ठाकूर, किसन पाटील, प्रल्हाद पाटील, देवेंद्र भोईर, विजया ठाकूर, निर्मला ठाकूर, कल्पना घरत, माजी सरपंच हनुमान भोईर, माजी अध्यक्ष आशिष पाटील, संजय ठाकूर, राकेश पाटील, जयंत पाटील, सामाजिक कार्यकर्ते राम मोकल, सुजित ठाकूर, प्रकाश कडू, हनुमंत आदी सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उर्वरित बाधित मच्छीमारांना एमएमआरडीएकडून आर्थिक नुकसानभरपाईची रक्कम देण्यात टाळाटाळ केली जात आहे. वारंवार पत्रव्यवहार, निवेदन, चर्चा, बैठकांनंतरही उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. **(पान २ वर..)**

युद्धाची झळ

## नवी मुंबईतील गौरी, शर्वरी युक्रेनमधून सुखरूप परतल्या

**नवी मुंबई : बातमीदार**

रशिया आणि युक्रेन या दोन देशांमधील भीषण युद्धामुळे अडकलेल्या भारतीयांना ऑपरेशन गंगा अंतर्गत मायदेशी आणले जात आहे. नवी मुंबईतील सीवूडमध्ये राहणारी गौरी प्रभू आणि सानपाड्यात राहणारी शर्वरी कदम या दोघीही सुखरूप भारतात परतल्याने तिच्या पालकांचा जीव भांड्यात पडला.

विविध देशांतील विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी युक्रेनमध्ये जात असतात. सध्या रशियाने युक्रेनवर युद्ध पुकारले असल्याने प्रत्येक देश आपापल्या विद्यार्थ्यांना तेथून सोडवून घरी पोहचवण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारत सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपल्या विद्यार्थ्यांसह नागरिकांना मायदेशी आणण्यासाठी ऑपरेशन गंगा हाती घेतले आहे.

या अंतर्गत युक्रेनमध्ये युद्धजन्य परिस्थितीत अडकलेली सीवूड्स दारावे सेक्टर २३ येथील गौरी प्रभू ही विद्यार्थिनी सुरक्षित आपल्या घरी पोहचली. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रणजित नाईक यांनी गौरीचे स्वागत केले. या वेळी भाजपचे पदाधिकारी सतिश निकम, कुणाल महाडिक, जयेश थोरवे हेही उपस्थित होते, तर भाजपचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ जगताप व सतीश निकम यांनी शर्वरीचे स्वागत केले. या वेळी श्रीमंत जगताप, शशी नायर, दिलीप पाटील, बाळासाहेब हांडे आदी उपस्थित होते.





## नवाब मलिकांच्या राजीनाम्यासाठी आज मुंबईत मोर्चा

मुंबई : प्रतिनिधी

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी भाजप बुधवारी (दि. ९) मुंबईत मोर्चा काढणार आहे.

मंत्री नवाब मलिक यांना ईडीने मनी लॉण्डरिंगप्रकरणी अटक केली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. असे असूनही केवळ मतांसाठी मलिकांचा राजीनामा महाविकास आघाडी सरकार घेत नाहीये हे संतापजनक आहे. त्यामुळे मलिकांचा राजीनामा घेतल्याशिवाय भाजप शांत बसणार नाही. परवानगी मिळो अथवा न मिळो मोर्चा काढणारच, अशी आक्रमक भूमिका भाजपने घेतली आहे.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत महाविद्यालयातील शिक्षिका ज्योत्स्ना सुधीर ठाकूर यांची रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्करपदी निवड झाली आहे. त्याबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ज्योत्स्ना ठाकूर यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, प्राचार्य साधना डोईफोडे, पर्यवेक्षक दीपक भरमूके, वसंत पाटील, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, भाऊ भोईर, बाबूराव कांबळे, जयवंत देशमुख, अशोक कडू, आशिष घरत, कमलाकर घरत आदी उपस्थित होते.**

# दररोज नवीन नाटकं बंद करा

## ▪ संजय राऊतांना किरीट सोमय्यांचे सडेतोड उत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी मंगळवारी (दि. ८) पत्रकार परिषद घेऊन भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यावर त्यांचे वाधवान यांच्याशी आर्थिक संबंध असल्याचा गंभीर आरोप केला. त्याला सडेतोड उत्तर देत किरीट सोमय्या यांनी, माझा वाधवान यांच्याशी काहीही संबंध नसून पुरावे असल्याशिवाय मी बोलत नाही. त्यामुळे संजय राऊत हे दररोज फक्त नवनवीन नाटकं करीत असल्याचा टोला या वेळी लगावला.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या राजकीय नाट्यामुळे वातावरण ढवळून निघाले आहे. त्यात अधिवेशन सुरू असल्यामुळे सत्ताधारी



आणि विरोधकांकडून दररोज नवनवीन आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सायंकाळी शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यावर गंभीर आरोप केले. तसेच, त्यांना ईडीचे पाचवे एजंट अशी टीकादेखील केली आहे. या पार्श्वभूमीवर किरीट सोमय्यांनीही त्वरीत पत्रकार परिषद घेऊन संजय राऊत यांच्या आरोपांचे खंडन केले आहे.

वाधवान यांच्यासोबत किरीट सोमय्या यांचे आर्थिक संबंध असल्याचा आरोप संजय राऊतांनी केला. त्याबाबत काही संदर्भांचा उल्लेख करतानाच, हे सर्व पुरावे पंतप्रधान कार्यालयाला पाठवणार असल्याचेही ते म्हणाले. मात्र माझा वाधवान यांच्याशी काहीही संबंध नाही. राऊतांना मुंबई पोलिसांनी उत्तर दिलेले आहे. मी अधिकृत पुराव्याशिवाय कोणतीही गोष्ट बोलत नाही. त्यामुळे संजय राऊत यांनी आपली नाटकं बंद करावीत, असेही ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांवरही साधला निशाणा

***उद्धव ठाकरे, संजय राऊतांनी सांगितलं की, नवाब मलिक मुस्लीम आहेत म्हणून त्यांना अटक केली. आता उच्च न्यायालयाने त्यांना जामीन दिला नाही, तर आता उद्धव ठाकरे याबाबत काय बोलणार आहेत? १९ बंगल्यांबाबत मुख्यमंत्री का बोलत नाहीत? असा सवाल सोमय्यांनी उपस्थित केला आहे.***





**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत महाविद्यालय गव्हाण कोपर येथील शिक्षिका ज्योत्स्ना ठाकूर यांची रयत शिक्षण संस्था लाईफ वर्करपदी निवड झाली आहे. याबद्दल भाजप तालुकाध्यक्ष व 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, प्राचार्य साधना डोईफोडे, पर्यवेक्षक दीपक भरमूके, वसंत पाटील, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, भाऊ भोईर, बाबूराव कांबळे, जयवंत देशमुख, अशोक कडू, आशिष घरत, कमलाकर घरत आदी उपस्थित होते.**




## खांदा परिसरात विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १४ येथे भाजप नगरसेवक मनोहर म्हात्रे यांच्या २०२०-२०२१च्या नगरसेवक निधीतून धाकटा खांदा स्मशानभूमीत हायमास्ट, भजन करण्यासाठी निवारा शेड तसेच गावातील प्रवेशद्वाराजवळील हायमास्ट येथे ग्रीलच्या कामाचा शुभारंभ मंगळवारी (दि. ८) करण्यात आला.

या कामांचे उद्घाटन हरिशेठ भगत, वसंत म्हात्रे, रामदास डोंगरे, काशिनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास भास्कर भगत, नरेश म्हात्रे, सुनील पाटील, अमित पाटील, रोशन भगत, रामभाऊ पाटील, रवी डोंगरे, शशी डोंगरे, गणेश पवार, भीमराव पोवार, राकेश म्हात्रे, विनायक म्हात्रे, बाळकृष्ण म्हात्रे, किशोर म्हात्रे, नितेश म्हात्रे, गोवर्धन म्हात्रे, विशाल तांबडे, राहुल भोईर, विनोद भगत, जितेंद्र डोंगरे, जनार्दन भगत आणि नगरसेवक मनोहर म्हात्रे उपस्थित होते.

## भाजपच्या वतीने ई-श्रमकार्ड शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजप प्रभाग क्रमांक ३२ तर्फे मोफत ई-श्रमकार्ड, हेल्थकार्ड, युनिवर्ल्सल कार्ड शिबिराचे आयोजन प्रमोदशेठ घरत, डी. आर. पाटील यांनी बोनसरी गाव या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये नागरिकांना नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते सदर कार्ड वाटप करण्यात आले होते. या वेळी माजी नगरसेविका माधुरी सुतार, महिला संघटक निर्मला सुतार, भाजप नवी मुंबई ओबीसी सेलचे जिल्हा अध्यक्ष राजेश पाटील, समाजसेवक जयेंद्र सुतार, हनुमंत रोडे, वार्ड अध्यक्षा सीमा रिडलांन, महिला बचतगट मार्गदर्शिका सायली चांदे, अनिता पाटील आणि विभागातील नागरिक उपस्थित होते.






**पनवेल : खांदा कॉलनीतील राजू महापूरकर यांना वाढदिवसानिमित्त महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, भाजप नेते भीमराव पोवार, गोपीनाथ मुंडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : महिला दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष आणि नगरसेवक अजय बहिरा यांच्या माध्यमातून महापालिकेच्या महिला कामगार, पेट्रोल पंपवरील महिला कर्मचारी, स्कूल व्हॅनचालक महिलांचा पुष्पगुच्छ देऊन मंगळवारी सन्मान करण्यात आला. या वेळी युवा नेते प्रतिक बहिरा, अतुल बहिरा, अक्षय भगत, जितू खुटकर, हारुन शेख, बबन कांबळे उपस्थित होते.**



**पनवेल : महिला दिनाचे औचित्य साधून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये केक कापून महिला दिन साजरा करण्यात आला. या वेळी प्राचार्य राज अलोनी यांच्यासह शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.**

## सीकेटी महाविद्यालयात विविध उपक्रमांनी महिला दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. ८) जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून व्याख्यान व प्राध्यापिका व महिला कर्मचाऱ्यांसाठी नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





या कार्यक्रमासाठी लक्ष्मी कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, पनवेलच्या उपप्राचार्या डॉ. विद्युत राजहंस प्रमुख वक्त्या लाभल्या होत्या. डोळ्यांची निगा कशी राखावी, विविध नेत्रविकार, त्यावरील उपचार याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात ८२ प्राध्यापिका व शिक्षकेत्तर महिलांनी सहभाग घेतला. या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी, काम करणाऱ्या महिलांना 'आधुनिक हिरकणी' ची उपमा देऊन सन्मानित केले. तसेच त्यांनी सर्व महिलांचे गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन स्वागत केले. महिला विकास कक्षाच्या प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी प्रास्ताविकात महिला दिनाचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाला आयक्यूएससी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. सोनाली हुद्दार, प्रा. पुजा दांडगे व प्रा. भावेश भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन महिला विकास कक्षाच्या माजी अध्यक्षा डॉ. स्मिता भोईर यांनी केले. सूत्रसंचलन विद्यार्थिनी प्रतिनिधी प्रतिभा पाटीलने केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## उरण चिर्ले येथे आगरी साहित्य मंचचे पोपटी काव्यसंमेलन

**चिरनेर : प्रतिनिधी**

काव्य दरबार या साहित्य सेवाभावी संस्थेतर्फे उरण चिर्ले येथे आगरी साहित्य मंचचे अध्यक्ष मोहन भोईर यांच्या अध्यक्षतेखाली पोपटी काव्यसंमेलन झाले.

या वेळी आचार्य अत्रे कट्ट्याचे अध्यक्ष धनंजय गोंधळी, ज्येष्ठ साहित्यिक हरिभाऊ घरत, काव्य दरबाराचे संस्थापक काशिनाथ मढवी, साहित्यिका दमयंती भोईर, रत्ने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष प्रकाश ठाकूर यांनी स्वागत करुन प्रास्ताविक केले. यानंतर अध्यक्ष मोहन भोईर, धनंजय गोंधळी, हरिभाऊ घरत, जे. एस. घरत यांच्या हस्ते पोपटीचे पूजन करण्यात आले. पोपटीचा आस्वाद घेत असतानाच कविता वाचनाच्या कार्यक्रमामध्ये ५७ कविंनी आपल्या कविता सादर केल्या. या वेळी काव्य दरबारतर्फे सात साहित्यिकांचा साहित्य पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मोहन भोईर, दमयंती भोईर, चंद्रकांत मढवी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन हरचंदा माळी यांनी केले, तर आभार चंद्रकांत मढवी यांनी मानले. मिनल माळी यांनी सूत्रसंचलन केले. भोजन व्यवस्था काशिनाथ मढवी यांच्या परिवाराने केली.



**पनवेल : महिला दिनानिमित्त खांदा कॉलनी भाजप कार्यालयात महिला मोर्चा अध्यक्ष राखी पिंपळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उपमहापौर सीताताई पाटील, सरचिटणीस आशा मुंढे, प्रेमा भोपी, मनीषा पाटील, संध्या जाधव, सोनाली सावंत, सीमा निकम, अनिता घाडगे, सानिका इंदुलकर, कांती शेट्टी, वारीजा गुजराण, विनोदा शेट्टी, अनन्या, माधुरी अवचटकर, सविता खराते, शैला मोरे, मनीषा गोळे, उषा कांबळे यांच्यासह कार्यकर्त्या उपस्थित होत्या. उपस्थितांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

पान १ वरून

### पनवेल महापालिकेतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम

कार्यक्रमाची सांगता बक्षीस वितरण समारंभाने करण्यात आली. या वेळी सिनेअभिनेत्री सविता मालपेकर उपस्थित होत्या. या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थितांचे आभार महिला बालकल्याण समिती सभापती हर्षदा उपाध्याय यांनी मानले.

सलग दोन वर्षे कोविड काळात सुटी न घेता महिला कर्मचारी काम करीत आहेत. त्यांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने थोडा विरंगुळा मिळाला.

### १४ मार्चपासून न्हावा-शिवडी सी लिंकचे काम बंद पाडण्याचा न्हावा ग्रामस्थांचा इशारा

एमएमआरडीएकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्यामुळे संतप्त झालेल्या सर्वपक्षीय ग्रामस्थांनी न्हावा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ७८९ बाधित मच्छीमारांना जोपर्यंत आर्थिक नुकसानीची रक्कम दिली जात नाही तोपर्यंत न्हावा-शिवडी सी लिंकचे काम १४ मार्चपासून बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती ग्रामस्थांनी या वेळी पत्रकार परिषदेत दिली.



**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड**
**जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली, ता. अलिबाग, जिल्हा रायगड**

**निविदा सूचना**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासन अंतर्गत व्यायाम साहित्य, खुली व्यायाम साहित्य व क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी अनुभवी व नामवंत परवानाधारक नोंदणीकृत, अनुभवी उत्पादक/वितरक यांचेकडून निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रांची संपूर्ण माहितीकरिता इच्छुक निविदाधारकांनी https://mahatenders.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक २२/०३/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत आहे.

सही/-
(रविंद्र नाईक)
जिल्हा क्रीडा अधिकारी
रायगड.






**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**बुधवार, दि. ९ मार्च २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ▪ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## संपादकीय

# खोट्या तक्रारींचा शिमगा

गेले कित्येक दिवस महाराष्ट्रातील राजकारण आरोप-प्रत्यारोपांच्या शिमग्याने ढवळून निघाले आहे. राजकीय प्रगल्भता आणि सुसंस्कृतपणासाठी हा महाराष्ट्र एकेकाळी प्रसिद्ध होता, यावर आता कोणाचाही विश्वास बसणार नाही. हा स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्र आहे, याचा विसर पडू देऊ नका, अशा कानपिचक्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मध्यंतरी दिल्या होत्या. पण त्यांच्याच महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपल्या नेत्याचे म्हणणे एका कानाने ऐकले आणि दुसऱ्या कानाने सोडून दिले, असेच म्हणावे लागेल.

**गेले २८ महिने महाविकास आघाडीचे सरकार कसेबसे तग धरून आहे. त्यांचे दोन महत्त्वाचे कॅबिनेट मंत्री निरनिराळ्या प्रकरणांमध्ये गजाआड आहेत आणि एकूण १४ जणांवर विविध तपासयंत्रणांची नजर आहे. त्यांच्या चौकशा सुरू आहेत. भारतीय जनता पक्षाचे नेते किरीट सोमय्या यांच्या आरोपांच्या भडिमारापुढे सत्ताधारी आघाडीतील नेते अक्षरश: घायाळ झाले आहेत. सोमय्या हे कधीच हवेतले आरोप करीत नाहीत. पुराव्याचे कागद हातात फडकवूनच ते बोलतात आणि सक्षम तपासयंत्रणांकडे रितसर तक्रारही गुदरतात. इतकेच नव्हे तर तक्रार गुदरल्यानंतर त्याचा फॉलोअपदेखील चिकाटीने घेतात. हे तर महाविकास आघाडीतील नेत्यांनाही मान्य असावे. शिवसेनेचे प्रवक्ता खासदार संजय राऊत यांनी मंगळवारी शिवसेना भवनात आणखी एक पत्रकार परिषद घेऊन सोमय्या यांच्यावर वारेमाप आरोप केले. तेव्हादेखील सोमय्या हे वारंवार तक्रारी दाखल करणारे सीरियल कम्प्लेनर आहेत, अशी टिप्पणी त्यांनी केली. खरे तर सीरियल कम्प्लेनर ही सोमय्या यांच्यासाठी एक प्रकारे कॉम्प्लिमेंटच ठरावी. अंमलबजावणी संचलनालय म्हणजेच ईडीतील काही अधिकाऱ्यांचे खंडणीखोरीचे रॅकेट असून, भाजपचे एटीएम असल्यासारखी ही तपासयंत्रणा वागते, असा सनसनाटी आरोप त्यांनी केला. राऊत यांनी केलेले आरोप सोमय्या यांनी ताबडतोब प्रत्युत्तर देत बिनबुडाचे ठरवले. कारण सोमय्या यांच्याप्रमाणे राऊत यांना पुरेशी कागदपत्रे दाखवता आली नाहीत. तुम्ही आमच्या अंगावर आलात, तर आम्हीही तुमच्या अंगावर येऊ एवढाच मर्यादित संदेश राऊत यांच्या पत्रकार परिषदेतून मिळाला. तपासयंत्रणांचा ससेमिरा मागे लागल्यानंतर महाविकास आघाडीतील नेत्यांनीही आक्रमक धोरण स्वीकारले असले तरी त्यात फारसा दम नाही. विरोधीपक्षातील नेत्यांवर खोट्या केसेस टाकण्यात येत असल्याचे तसेच त्यासाठी अनेकांकडून खोटे जबाब नोंदवण्यात आल्याचा गौप्यस्फोट विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधिमंडळ सभागृहातच केला. सरकारी वकील आणि पोलीस अधिकाऱ्यांकडून विरोधीपक्षाच्या नेत्यांना कोंडीत पकडण्यासाठी षड्यंत्र रचण्यात येत असल्याचे पुरावे त्यांनी सभागृहासमोर ठेवले. आपण केलेले आरोप सिद्ध झाल्यास महाविकास आघाडीची इभ्रत तर जाईलच पण सभागृहाची विडंबनाही होईल, असेही फडणवीस म्हणाले. फडणवीस यांच्या या वक्तव्यात फार मोठे तथ्य आहे. विधानसभा अध्यक्षांना फडणवीस यांनी एक पेनड्राइव्ह भरून पुरावे सुपूर्द केले आहेत. तब्बल २० ते २५ वेबसीरीज निर्माण होऊ शकतील, एवढा नाट्यपूर्ण असा डेटा त्यात आहे, असे राजकीय वर्तुळात बोलले जाते. फडणवीस यांनी टाकलेला आरोपांचा हा बॉम्ब महाविकास आघाडीत चांगलाच मोठा धमाका करणार यात शंका नाही. दहा मार्चनंतर महाविकास आघाडी सरकार कोसळेल, अशी भाकिते मध्यंतरी करण्यात आली होती. त्या कोसळण्याची ही सुरुवात तर नाही ना अशी चर्चा या राजकीय शिमग्यात रंगू लागली आहे.**

# ग्राहक तक्रारीसाठी तालुकास्तरावर व्यवस्था असावी

**खबरबात**
**महेश शिंदे**





माणसाचं आयुष्य गतिमान झालंय, आज मनुष्याकडे सुखसोयी आहेत, पण आरोग्य आणि वेळ नाही. या धकाधकीच्या जीवनात तयार अन्नधान्याला जास्त मागणी आहे. याचा फायदा उत्पादन आणि विक्रेते घेत आहेत. बाजारात भेसळ आणि निकृष्ट दर्जाच्या वस्तू मोठ्या प्रमाणात विकल्या जात आहेत. अशावेळी तक्रार कोठे करावी? कधी करावी? आणि कशी करावी? हे फसवणूक झालेल्या ग्राहकाला माहितच नसते. अशा वेळी जाऊ दे, मरु दे, आपल्याला काय करायचं, असे म्हणत ग्राहक तक्रार करीत नाहीत आणि त्यामुळे लुटमारी करणाऱ्यांना अभय मिळतं. या गोरख धंद्याला आळा घालायचा असेल तर प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ग्राहक तक्रार निवारण केंद्र उभारली गेली पाहिजेत.

माणसाची जीवशैली बदलली आहे. आज प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात हॉटेल किंवा पॅकिंग फुड यांचा वापर वाढला आहे. तसेच बाजारात अनेक प्रकारच्या वस्तू विक्रीला असतात. त्यांतील खाद्यपदार्थ यांच्या पॅकिंगवर बॅच क्रमांक, उत्पादन तारीख, वापराची अंतिम तारीख, मापन आणि किंमत यांचा उल्लेख असलाच पाहिजे, असा नियम आहे. वापराची अंतिम तारीख संपल्यानंतर सदर वस्तूची विक्री करता येत नाही. मात्र बाजारात याच नियमांचे आणि कायद्याचे उल्लंघन करुन मोठा गोरख धंदा सुरू आहे. अगदी पाण्याच्या बाटलीपासून ते जीवनावश्यक दूध आणि औषधांमध्ये भेसळ, किमतीचा लोच्या, बोगस पॅकिंग करून माल विक्री केला जातो. बरं ही फसवणूक अशी केली जाते की, ग्राहकाला याचा थांगपत्ता लागत नाही. मध्यंतरी 'बेनकाब' हा सिनेमा पाहायला मिळाला. या सिनेमात अन्न पदार्थांत कशाप्रकारे भेसळ केली जाते, याचे सुंदर चित्रीकरण दाखवले आहे. दूध आणि मासे सडू नयेत म्हणून 'फॉर्मोलीन' या केमिकलचा वापर केला जातो. जे फॉर्मोलीन मृतदेह सडू नयेत, म्हणून वापरले जाते. आपण डिपफ्रीजचे मासे मोठ्या प्रमाणात खातो, मात्र हे मासे जास्तकाळ टिकावेत म्हणून या रसायनाचा वापर केला जातो. दुध घट्ट दिसावे म्हणून त्यात युरीया टाकला जातो तर दुधाला फेस येण्यासाठी कास्टीक सोडा वापरला जातो. पॅकिंग ब्रेड याचे आयुष्य तीन दिवसांचे असते. मात्र त्यावरील तारीख खोडून हे ब्रेड गरीब वस्तीमध्ये सर्रास विकले जातात. डाळींना चमक येण्यासाठी डाळीत चरबी टाकून पॉलीश केले जाते व ही डाळ शाकाहारी समजून लोक खातात. अशा काही गोष्टी या सिनेमात स्पष्ट दाखविण्यात आल्या आहेत. सिनेमा हा केवळ मनोरंजनासाठी नसून त्यातूनही माहिती मिळून लोक जागृत होऊ शकतात. अशा प्रकरची होणारी फसवणूक थांबण्याची लोकांना जागृत होणे गरजेचे आहे.

आज समाजात ग्राहक मंचाच्या नावाने अनेक संघटनांची दुकाने उघडली आहेत. मात्र तडजोड करुन प्रकरण परस्पर मिटविणे, हा धंदा सुरू आहे. ज्याप्रमाणे एखादा गुन्हा घडला की, त्याची दखल पोलीस स्टेशन घेते, त्याचप्रमाणे ग्राहकांची फसवणूक आणि भेसळ रोखण्यासाठी तालुकास्तरावर शासनाची ग्राहक तक्रार निवारण केंद्र झाली पाहिजेत. कायद्यात बदल करून भेसळ करणाऱ्यांना कडक शासन होईल, असे कायदे आणले पाहिजेत. भाजीपासून चिकनपर्यंत आणि पावापासून माव्यापर्यंत आजकाल सगळीकडे भेसळ होत आहे. चिकनच्या बाबतीत एक धक्कादायक प्रकार पुढे आला आहे. कोंबडी लवकर मोठी होऊन वजन वाढण्यासाठी इंजेक्शन दिले जाते, ते चिकन खाल्यामुळे मुली लवकर वयात येऊन त्यांना वेळेच्या आधीच मासीक पाळी येण्याचे प्रकार घडू लागले आहेत. या भेसळीमुळे मुलांच्या आरोग्यावर घातक परिणाम होऊ लागले आहेत. समाजात कर्करोगाचे प्रमाण वाढू लागले आहे. याची गंभीर दखल घेतलीच पाहिजे. अन्न आणि औषध प्रशासन सक्षम करून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी त्यांचे अधिकारी व कर्मचारी नेमून कारवाया व्हायला हव्यात. आजकाल या खात्याकडे केवळ परवानग्यांसाठी अर्ज केले जातात. मात्र कारवायांच्या बाबतीत न बोललेलेच बरे.

ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी शाळा कॉलेज, नाट्यगृह, सिनेमागृह, टीव्हीवर याचे लघुपट दाखवून जनजागृती केली पाहिजे. तसेच चौकाचौकत ग्राहकांचे हक्क दर्शविणारे फलक लागले पाहिजेत. प्रत्येक दुकानाच्या बाहेर ग्राहक तक्रारीसाठी थेट मोबाइल क्रमांक दर्शविला पाहिजे त्याच सोबत अन्न आणि औषध प्रशासनाचा मोबाइल क्रमांकही दर्शविला पाहिजे. त्यामुळे ग्राहकाला सहज आपली तक्रार करता येईल. जागृकता हेच या युद्धातील खरे हत्यार आहे.

# माणगाव येथे कुणबी समाज विकास मंडळाचा सामाजिक मेळावा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**




(छाया : सलीम शेख)

समाजाच्या हितासाठी एकोपा आवश्यक आहे. समाजाचा सर्वांगीण विकास आणि उन्नतीसाठी तरुणांनी एकत्रित येऊन योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी रविवारी (दि. ६) येथे केले.

माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळ साले ग्रुपतर्फे रविवारी तालुक्यातील कोशिंबळे भैरी भवानी मंदिराच्या प्रांगणात समाज विकास मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याचे उद्घाटन पंचायत समितीचे माजी सभापती प्रभाकर उभारे यांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात महादेवराव बक्कम समाज बांधवांना मार्गदर्शन करीत होते. समाजातील कालबाह्य झालेल्या जुन्या चालीरिती बंद करून नवीन चालीरिती सुरू कराव्यात, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

कुणबी समाज विकास मंडळाच्या साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांनी स्वागत केले. प्रभाकर उभारे, ज्येष्ठ नेते रामभाऊ टेंबे, बाळाभाऊ नवगणे, शैलेश भोनकर, संगीता बक्कम, नीता करकरे, संतोष भात्रे, काशीराम पाखुर्डे, दशरथ वाढवळ, प्रतिभा पोळेकर, नितीन खडतर, अशोक पाटील, कृष्णा पानावकर आदींनी मनोगत व्यक्त केले. मेळाव्यात ऑर्केस्ट्रा गीतमंथन तसेच कुणबी समाजातील महिलांचा पारंपरिक गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. कुणबी समाज विकास मंडळाच्या साले ग्रुपची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. पारुनाथ मुंढे, संदीप खरंगटे, टिकम भोनकर, गंगाराम उभारे, रवींद्र अर्बन, दीपक ढाकवळ, सहदेव भोनकर, सहदेव बक्कम, संजय बक्कम आदींसह साले, कोशिंबळे, तिलोरे, दाखणे, खरवली, उमरोली, चेरवली, सुरव तर्फे तळे, सुरवतर्फे निजामपूर, राजिवली, नाईटने कलमजे, बामणोली, मांगवली, निळगुण, साळवे, पानोसे, उतेखोलवाडी, खर्डी, कोस्ते बुद्रुक, नाणोरे, मुंढेवाडी येथील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेणमधील शिबिरात ३०८ जणांचे रक्तदान

**पेण : प्रतिनिधी**





(छाया : अनिस मनियार)

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पेण कुंभारआळी येथे रविवारी (दि. ६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३०८ जणांनी रक्तदान केले.

पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिरात अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालय रक्तपेढीचे डॉ. दिपक गोसावी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्त संकलित केले. डॉ. महानंदा म्हात्रे, डॉ. मिलिंद पाटील, परिचारिका श्वेता म्हात्रे, भाग्यश्री बुरंबे व इतर आरोग्य कर्मचारी या वेळी उपस्थित होते. पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील, उपनगराध्यक्षा वैशाली कडू, युवा नेते ललित पाटील, नगरसेवक अजय क्षीरसागर यांनी शिबिराला भेट देऊन प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले.

# मुरूडमध्ये आदिवासी महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मुरुडमधील अंजुमन इस्लाम महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षातर्फे विहूर आदिवासीवाडीवरील ३० कुटुंबांतील महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमास महिला विकास कक्षाच्या प्रा. खराडे, प्रा. श्रुती कारभारी, प्रा. समिक्षा माळी तसेच स्वालिहा हलडे, सीफत हलडे, नईमा चोगले, तेहसिन संगे, जुहेब मोदी आदी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



(छाया : संजय करडे)

# मुरूडच्या सुधीर नाझरे यांची छायाचित्रे मुंबईतील प्रदर्शनात झळकणार

**मुरुड : प्रतिनिधी**

विविध वर्तमानपत्रातून कोकणचे सौंदर्य जगासमोर आणणारे मुरुड येथील छायाचित्रकार सुधीर नाझरे यांच्यासह राज्यातील ११ जणांच्या छायाचित्रांचे महाराष्ट्र दर्शन या विषयावर विशेष प्रदर्शन फोर्ट मुंबई येथील पिरामल आर्ट गॅलरी येथे भरणार आहे.

महाराष्ट्र दिनाच्या वर्धापनदिना निमित्त मुंबईतील द फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडियाचे सदस्य असलेले ११ नामवंत छायाचित्रकार एकत्र आले होते. त्यांनी ३० एप्रिल ते ७ मे या कालावधीत मुंबईतील पिरामल आर्ट गॅलेरीमध्ये 'महाराष्ट्राचे दर्शन' हे छायाचित्र प्रदर्शन भरविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक समृद्धीचे दर्शन छायाचित्रातून होणार आहे.

या प्रदर्शनामध्ये राजेंद्र वाघमारे, गजानन दुधलकर, प्रकाश दुधलकर, वैभव जागुष्टे, सुभाष झिरंगे, किशोर निकम, सुधीर नाझरे, केदार भिडे, डॉ. सुधीर गायकवाड, दीपक बारटक्के, गोपाळ बोधे, स्वप्नील आगस्कर आदी सुप्रसिद्ध छायाचित्रकारांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपलेली विविध छायाचित्रे पाहण्यास मिळणार आहे. तसेच रायगडावरील शिवराज्याभिषेक दिनी करण्यात येणाऱ्या फोटोग्राफीतील बारकावे व अनुभव सुधीर नाझरे यांच्या व्याख्यानात प्रेक्षकांना ऐकावयास मिळणार आहेत.

# कर्जत देवपाडा येथे शिवमंदिराचा वर्धापन दिन

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील देवपाडा गावातील पुरातन शिवमंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला होता. या मंदिराचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

देवपाडा गावात भगवान शंकराचे पुरातन मंदिर होते. त्या कौलारू मंदिराचा जीर्णोद्धार ग्रामस्थांनी लोकवर्गणी काढून केला आहे. जीर्णोद्धार करण्यात आलेल्या मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त शिवलिंग अभिषेक करून सोहळ्याला सुरुवात झाली. दुपारी महापुजा आणि त्यानंतर अंथरात येथील ग्रामस्थ मंडळाने हरिपाठ सादर केला. हभप विजय महाराज पाटील यांनी हरिकीर्तन केले. रात्री देवपाडा गावातील शिव प्रासादिक भजन मंडळाने जागर भजन सादर केले.

हा जीर्णोद्धार सोहळा यशस्वी होण्यासाठी ग्रामस्थ हरिचंद्र मुरबे, तानाजी राणे, विशाल तुपे, लक्ष्मण शिनारे, अरुण राणे, निवृत्ती झोमटे, प्रवीण तुपे, अश्विन तुपे, जगदीश तुपे, तातू राणे, पंढरीनाथ विरले, राजेंद्र तुपे, गणेश विरले, भास्कर तुपे यांच्यासह ग्रामस्थ मंडळाचे महत्त्वाचे योगदान होते.

# खोपोली 'कोमसाप'च्या अध्यक्षपदी उज्वला दिघे

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या खोपोली शाखा अध्यक्षपदी ज्येष्ठ कवियत्री उज्ज्वला वामन दिघे यांची



बिनविरोध निवड करण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिक र. वा. दिघे यांच्या त्या स्नुषा आहेत.

कोमसापच्या खोपोली शाखेची २०२२-२४ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणी घोषित करण्यात आली. त्यात उज्ज्वला दिघे (अध्यक्ष), प्रकाश राजोपाध्ये, सुधा इतराज (उपाध्यक्ष), नरेंद्र हर्डीकर (कार्याध्यक्ष), वामन दिघे (कोषाध्यक्ष), जयश्री पोळ (सचिव), निशा दळवी (सहसचिव), रेखा कोरे (जिल्हा प्रतिनिधी) यांचा समावेश आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून अनिल रानडे, मोहिनी गुरव, मधुमिता पाटील, वैशाली मोरे, सल्लागारपदी उल्हासराव देशमुख, सूर्यकांत सरवदे, डॉ. भाऊसाहेब ननावरे, दत्ताजी मसुरकर यांची निवड करण्यात आली आहे.

# खोपोलीत जमशेदजी टाटा यांची जयंती उत्साहात

**खालापूर : प्रतिनिधी**



(छाया : अरुण नलावडे)


तालुक्यातील सावरोली येथील टाटा स्टील कंपनीमध्ये टाटा समुहाचे संस्थापक जमशेदजी नुसेरवानजी टाटा यांची १८३ वी जयंती मोठ्या हर्षोल्हासात विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली.

टाटा स्टीलचे कार्यकारी संयत्रं प्रमुख कपिल मोदी यांनी देशातील आधुनिक औद्योगिकीकरणाचे जनक मानल्या जाणाऱ्या जे. एन. टाटा यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी टाटा स्टील हाऊसिंग कॉलनी आणि कपंनीमध्ये आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. तसेच कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय जे. एन. टाटा यांच्या जीवनावरील एक छोटेसे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते, कंपनीच्या हाऊसिंग कॉलनीमध्ये (वसाहत) कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी एक ओपन जिम यावेळी समर्पित करण्यात आली.

## आरोग्य प्रहर

# अंकुरलेल्या लसणाचे फायदे

अंकुरलेल्या भाज्या आणि फळे आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे अनेकांचे मत आहे, तर अनेक जण असेही मानतात की, अंकुरलेली फळे आणि भाज्यांमध्ये विषारी रसायने निर्माण होतात. कदाचित काही फळे आणि भाज्यांमध्ये हा बदल होऊ शकतो, मात्र लसूण ही एकमेव अशी गोष्ट आहे की, कोंब आल्यानंतरही त्याचे सेवन केल्यास कोणताही तोटा अथवा नुकसान होत नाही.



**हृदयविकारापासूनही सुटका :** जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल अँड फूड केमिस्ट्री यामधून प्रकाशित केलेल्या माहितीनुसार, नियमित लसणापेक्षा अंकुरलेल्या लसूणचे अधिक फायदे आहेत. ज्याप्रमाणे लसणाच्या सामान्य सेवनाने पचनक्रिया सुधारण्यास, सर्दी-खोकल्यापासून आराम मिळतो, कोलेस्टेरॉल कमी करण्यास आणि शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते. त्याचप्रमाणे अंकुरलेल्या लसूणचे सेवन केल्यास कर्करोग, पक्षाघातासारख्या समस्या बऱ्या होतात आणि हृदयविकारापासून सुटकाही होते.

**फायदेशीर लसूण :** लसणाची उगवण होत असताना त्यामध्ये फायटोकेमिकल्सचे प्रमाण वाढते. यामुळेच शरीरातील कर्करोगाच्या पेशी आणि कर्करोग निर्माण करणाऱ्या घटकांना रोखण्यात मदत होते. लसणातील अँटिऑक्सिडंट गुणधर्म कर्करोगाच्या मुख्य कारणांपैकी एक असलेल्या मुक्त ऑक्सिजन रॅडिकल्सला काढून टाकण्यासाठी खूप उपयुक्त आहेत.

ज्याप्रमाणे फायटोकेमिकल्स कर्करोगाच्या घटकांना विरोध करतात, त्याचप्रमाणे ते एन्झाईम्सदेखील वाढवतात. त्यामुळे हार्ट ब्लॉकेज टाळण्यास मदत होते. लसूणचे नियमित केलेल्या सेवनामुळे हृदयविकार आणि हृदयविकारापासून वाचण्यासाठी मदत होते.

**पक्षाघाताचा धोका कमी होतो**

अंकुरलेल्या लसूणामुळे शरीरात आयर्न वाढते. त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होत नाहीत, त्याला लसूण प्रतिबंध करते. तसेच लसूणमध्ये नायट्रेट्सदेखील असतात, जे धमन्या पसरवण्यास (किंवा रुंद) करण्यास मदत करतात. अशा प्रकारे स्ट्रोक आणि रक्ताच्या गुठळ्या शरीरात निर्माण होत नाहीत.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी उपयुक्त**

जर तुम्हाला वारंवार सर्दी-खोकला किंवा संसर्ग होत असेल तर अंकुरित लसणाचे सेवन करा. ते शरीरात अँटिऑक्सिडंट्स भरून रोगप्रतिकारक शक्ती तयार करते. अंकुरित लसूण सर्दी, खोकला, सर्दी आणि ताप यांसारख्या फ्लूच्या लक्षणांपासून आराम देण्यासाठी प्रभावी असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे.

# मांडला-काकळघर रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांना दिले निवेदन



**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील दूवा असलेल्या मांडला-काकळघर रस्त्याच्या दुरावस्थेकडे संबंधित मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून, या रस्त्याचे काम तातडीने करण्यात यावे, अशी मागणी मांडला ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता सुरेश पालवणकर व ग्रामस्थांनी अलिबाग येथे कार्यकारी अभियंता संजय मंत्री यांची भेट घेवून केली व त्यांना या मागणीचे निवदेन दिले.

मांडला-काकळघर रस्त्याची दुरवस्था झाली आहे. खड्ड्यांमुळे एसटी सेवा बंद असल्याने सकाळच्या वेळेत फळ-भाजीपाला व दुध विक्री करणाऱ्या महिलांना तसेच परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिलांना, विशेष करून गरोदर मातांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. मांडला-काकळघर रस्त्याची दुरुस्ती करावी, यासाठी अनेकवेळा निवेदने देवूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी मांडला सरपंच सुचिता सुरेश पालवणकर यांच्यासह अलिबाग येथे जाऊन मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता संजय मंत्री यांची भेट घेतली. यावेळी असगर दळवी, राजेश पाटील, धर्मेंद्र गायकवाड, शैलेश रातवडकर, सतेज ठाकूर, सैयद पांचलकर, गिता नागोठकर, सुहासीनी थळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मांडला-काकळघर रस्त्याचे काम तीन वर्षांपुर्वीच मंजूर झाले आहे. मात्र प्रत्यक्षात कामाला अजूनही सुरूवात झालेली नाही.

असगर दळवी यांनी या वेळी कार्यकारी अभियंता यांना सांगितले की, काकळघर व मांडला या दोन्ही ग्रामपंचायतीचे सरपंच आमच्या सोबत आहेत. यापूर्वीही अनेक वेळा आम्ही येवून गेलो. प्रत्येक वेळी थोड्याच दिवसात काम सुरू करतो, ठेकेदाराला नोटीसा काढल्या आहेत, असे सांगितले जाते पण तीन वर्षात कामात काहीच प्रगती नाही.


**शॉप विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत ६१५ बिल्टअप एरिया असलेले शॉप विक्री करणे आहे.

-: संपर्क :-
9321592113
8104477440


# पुरुषांनी महिलांना सन्मानाने वागवावे -श्रीकांत देशपांडे



**अलिबाग : प्रतिनिधी**

स्त्रियांना त्यांचे हक्क मिळवू देण्याची तसेच त्यांच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी पुरूषांवरदेखील आहे. पुरूषांनी स्त्रियांना सन्मानाने वागवले पाहिजे, असे मत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी मंगळवारी (दि. ८) अलिबाग येथे व्यक्त केले.

जागतिक महिला दिनानिमित्त राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, जे. एस. एम. महाविद्यालय आणि रायगड जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी पीएनपी नाटचगृहात परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात श्रीकांत देशपांडे बोलत होते.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा दळवी, वैशाली पाटील, मुमताज शेख, प्रयोगशील शिक्षक सुजाता पाटील, प्राध्यापक डॉ. श्याम पाखरे, पत्रकार जयंत धुळप, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत सोनवणे यांनी आपले विचार मांडले. मुंबई विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. दीपक पवार यांनी सूत्रसंचालन केले.

भारतात लोकशाही बळकट करायाची असेल तर संविधाने दिलेल्या सामानत्वावर चालावे लागेल. लैगिक भेदभाव न करता स्त्रियांना त्यांचे हक्क दिले पाहिजेत. स्त्रीयांच्या समस्या या सर्व समाजाच्या समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठी पुरूषांनी देखील पुढाकार घेतला पाहिजे, असा सूर स्त्रया आणि लोकशाही या विषयावरील परिसंवादात उमटला.

# महाड भाजपची महिला रॅली आणि व्यंजन स्पर्धा

**महाड : प्रतिनिधी**

महिला दिना निमित्त महाड भाजप महिला मोर्चाच्या वतीने मंगळवारी शहरातून महिलांची भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली, तसेच व्यंजन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते.



महाडमध्ये विविध संघटनांच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात आला. दरम्यान, भाजप महिला मोर्चाच्या वतीने महाड शहरात महिलांची भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये महिला शक्तिचा विजय असो, जिजाऊ आणि सावित्रीचा जयजयकार करण्यात आला. भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रश्मी वाझे, जिल्हा उपाध्यक्षा निलीमा भोसले, जिल्हा कार्यकारिणी सदस्य डॉ. मंजुशा कुद्रीमोती, शहर अध्यक्षा नमिता दोशी, प्राजक्ता दळवी, श्वेता ताडफळे, आदिती ताडफळे, श्रध्दा भोसले, कल्पना विचारे, आराधना इंगळे, विद्या बुटाला, मेघना राठोड, नंदिनी मोरे, मंजिरी जोशी, सई शिंदे यांच्यासह असंख्य महिला सहभागी झाल्या होत्या. सायंकाळी विरेश्वर मंदिर सभागृहात व्यंजन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.

# रोह्यात महिलांची हिमोग्लोबिन तपासणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ ब्रुदुक ग्रामपंचायतीच्या वतीने महिला व किशोरवयीन मुलींकरिता मोफत हिमोग्लोबिन तपासणी व रक्तवाढी करिता औषध वाटप करण्यात आले. तसेच महिलांना शिलाई मशीन व प्रमाणपत्र देण्यात आले.

रोठ ब्रुदुक ग्रामपंचायत सरपंच नितीन वारंगे, उपसरपंच वेदीका डाके, भाजप युवामोर्चाचे जिल्हा अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, सदस्या वैभवी भगत, अक्षता वारंगे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, ग्रामसेविका अलका बामगुडे, श्रद्धा घाग, सुप्रिया वारंगे, अमृता साळुंखे, प्रतीक्षा वारंगे, अमृता डाके, दिपिका डाके, रोहिणी गोसावी, यामिनी बोरकर, सोनाली भगत, रश्मी खैरे यांच्यासह अनेक महिला या वेळी उपस्थित होत्या.


**SRM E-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Tender-03/2021-22 Dtd. 09.03.2022 RFX No. 7000022466** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for the providing light Motor Vehicle Jeep Type ( i.e. Xylo, Mahindra Bolero/TUV, Sumo Gold etc) services along with fuel and driver at 100 kV Roha S/s under EHV (O&M) Division Mahad For the Year 2022-23. | **Rs. up to 5,37,229/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 09.03.2022 @ 00:00 hrs. to 15.03.2022 @ 23:59 Hrs. for above tender
for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**



**SRM E-Tender Notice**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works under EHV Testing. Dn., Panvel

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Amount in Rs. | EMD in Rs. | Tender fee in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/T.DN./PNL/ TECH/Ten - 1/2022-23 **RFX No. - 7000022475** | Hiring LMV for use of EE at EHV Testing. Dn., Panvel | 5,99,984 | 6000 | 500/- + GST |
| 2 | EE/EHV/T.DN./PNL/ TECH/Ten-3/2022-2023 **RFX No. - 7000022476** | hiring of Light Motor Vehicle – 2 for Testing batches at EHV Testing Division, Panvel | 5,99,984 | 6000 | 500/- + GST |
| 3 | EE/EHV/T.DN./PNL/ TECH/Enquiry-4/2022-2023 **RFX no. - 7000022490** | hiring of Light Motor Vehicle – 3 for Testing batches at EHV Testing Division, Panvel. (For testing unit, Dombivali) | 5,99,984 | 6000 | 500/- + GST |

Submission of bids from 08.03.2022 to 15.03.2022 up to 23.59 hrs., Bid opening date and time :- 16.03.2022 at 10:00 hrs. (Technical) and at 11:00 hrs. (Commercial) if possible.
For further details visit our Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact person :** The Executive Engineer -9930667505
The Dy.Executive Engineer (O) - 9619499485
**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV Testing. Dn., Panvel**



**E-TENDER EXTENSION NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites E-Tender from registered SRM vendors on Mahatransco Website**

| Sr.No. | Tender No. | Tender Name | Tender Amount | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-7/2021-22 RFx No. 7000022370 | SRM E-Tender for providing daily sweeping / cleaning services at office, godown & store yard area of Major Stores Panvel for the FY 2022-23. | Rs. 3.06 Lakh | 14.03.2022 upto 23:59 Hrs. |

EMD amount Rs. 5000.00 & Tender fees Rs. 525.00 GST extra for submission of bids.

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** DYEE, Mob No. 9930057633

**Sd/-**
**EE, MAJOR STORES PANVEL**


# ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
# ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**फेब्रुवारी २०२२**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | विनोद दामोदर शेरखाने, संगीता दामोदर शेरखाने | बेन्नेट कोलमन ॲण्ड कंपनी | सदनिका नं. १४०६, १४ वा मजला, आय विंग, बालाजी सिम्फोनी, शिलोत्तर रायचूर | पवल ३-९९५१-२०१९ | १७/०६/२०१९ |
| २ | तुषार दिलीप पाटील | मधुकर मायंजी पाखरे | सदनिका नं .०४, तळ मजला, एई/२, प्रेरणा को. हौ .सो.लि., शिलोत्तर रायचूर | पवल २-१००-२०१८ | ०४/०१/२०१८ |
| ३ | मोहम्मद आफताब शेख | राकेश गजानन पवार, वैशाली राकेश पवार | सदनिका नं .३०१, तिसरा मजला, जे विंग, बि.नं.४, एई/२, साई इन्क्लेव्ह को. हौ .सो . लि . शिलोत्तर रायचूर | पवल १-६२३३-२०२१ | १५/०७/२०२१ |
| ४ | स्वाती नितीन गायकवाड | जितेंद्र लालचंद दोशी | सदनिका नं .००२, तळ मजला, डी विंग, बालाजी लाईफ स्टाईल, पालीदेवद | पवल १-००५३०-२०११ | ११/०१/२०११ |
| ५ | मनोहर नथू महाजन, मनीषा मनोहर महाजन | नारसय्या पी. पसरथी | सदनिका नं .१६, दुसरा मजला, बि.नं .बी ९, एई/२, साई सागर को. हौ .सो . लि., पालीदेवद | पवल १-१९०-२०२२ | ०७/०१/२०२२ |
| ६ | विजया जयसिंह मोहिते | मनिषा दशरथ कुंभार | सदनिका नं.४, तळ मजला, श्रीकृष्ण को हौ .सो .लि., वृंदावन हौसिंग कॉम्प्लेक्स, पालीदेवद | पवल-७४५-२००३ | २७/०३/२००३ |
| ७ | अरूणा माधव माळी | श्रीमती आनंद | सदनिका नं .०७, पहिला मजला, बि.नं सी ३, मातोश्री को. हौ .सो . लि ., शिलोत्तर रायचूर | पवल ३-३७५९-२०१५ | २९/०६/२०१५ |
| ८ | यमुना परशुराम गोसावी, परशुराम काशिनाथ गोसावी | मे गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका नं.४०४, चौथा मजला, सानवी रेसिडेन्सी, पालीदेवद | पवल २-१४४४८-२०२१ | २०/१०/२०२१ |
| ९ | भरत भागोजी शिबे, मिनाक्षी भरत शिबे | मे.एन.सी.डेव्हलपर्स | सदनिका नं .३०२, तिसरा मजला, बी विंग, रादगुरू रेसिडेन्सी, शिलोत्तर रायचूर | पवल ३-३४२७-२०२१ | १७/०२/२०२१ |
| १० | रविशंकर दुऊरी, प्रियांका भूषण | पद्मा श्रीनिवासन | रो हाऊस नं.०८, विघ्नहर्ता इन्क्लेव्ह, फेज ४, शिलोत्तर रायचूर | पवल४-४२०६-२०२१ | २६/०३/२०२१ |
| ११ | राहूल मंगेश रेडीज, तनया राहूल रेडीज | तृप्ती हरीश्चंद्र रामण्णा, हरीश्चंद्र रामास्वामी रामण्णा | सदनिका नं .बी २०२, दुरारा मजला, बि.नं. ३, कार्तिक्य पार्क को. हो. सो : लि., शिलोत्तर रायचूर | पवल २-६९०-२०२० | १७/०१/२०२२ |
| १२ | श्रीकृष्ण तातोबा सावंत | शिकारा कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. | सदनिका नं . १०२, पहिला मजला, ए विंग, शिकारा रेसिडेन्सी, शिलोत्तर रायचूर | पवल ३-१४४५०-२०२१ | १५/०९/२०२१ |
| १३ | निशीकांत मारूती कांबळे, विदया निशीकांत कांबळे | सुनिता एस . गावरी | सदनिका नं . २४१, दुसरा मजला, बि.नं.५, टाईप सी, फेज २, वृंदावन रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स, निलांचल को . हौ. सो. लि ., पालीदेवद | पवल २-१५०६१-२०२१ | २९/१०/२०२१ |
| १४ | संजीवकुमार श्यामसुंदर चौधरी | सिध्दार्थ कुमार दत्ता | सदनिका नं . सी २०१, दुसरा मजला, बि.नं. ३, सी विंग, साक्षी पार्क २, को. हौ सो. लि., शिलोत्तर रायचूर | पवल २-११११४-२०२० | ०३/१२/२०२० |
| १५ | अंतरा अमोल इंदुलकर | जया प्रकाश नायर, रम्या जया प्रकाश नायर | सदनिका नं .१४४, पहिला मजला, बि.नं.१/२, बी विंग, वृंदावन रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स, अजिंक्यतारा को. हौ. सो. लि., पालीदेवद | पवल४-१४६०-२०२० | ०४/०२/२०२० |
| १६ | राजेंद्र पांडुरंग वाघमारे, सोनाली राजेंद्र वाघमारे | योहान उमाकांत बोर्डे | सदनिका नं .१०४, पहिला मजला, पुष्पक को. हौ. सो. लि., शिलोत्तर रायचूर | पवल ५-१८१६-२०२२ | ०२/०२/२०२२ |
| १७ | सरनराज सुब्बुराज नायकर, विग्नेश्वरी सरनराज | सुरेश के मॅथ्यू | सदनिका नं .३, तळ मजला, बि.नं .एल २, नवजीवन को. हौ. सो. लि. पालीदेवद | पवल २-४६७९-२०२१ | १५/०३/२०२१ |
| १८ | प्राजक्ता अभिजीत ओणेकर | फरजाना अरीफ दळवी | सदनिका नं.००१, तळ मजला, बि.नं. ४, स्वागत कॉम्प्लेक्स, शिव सह्याद्री को. हौ. सो.लि. पालीदेवद | पवल ५-१३८२२-२०२१ | ०३/११/२०२१ |
| १९ | अश्विनी रोशन चव्हाण, रोशन रमेश चव्हाण | मे.एन.सी. डेव्हलपर्स | सदनिका नं.०४, तमा मजला, बी विंग, सद्गुरु रेसिडन्सी, शिलोत्तर रायचूर | पवल ३-१११७०-२०२० | २७/११/२०२० |
| २० | कुंदा अनुरथ गोरे | मनोज बाबूराव देशमुख | सदनिका नं .१०४, पहिला मजला, ई विंग, निलांबरी को. हौ. सो. लि. शिलोत्तर रायचूर | पवल ३-८७-२०१८ | ०४/०१/२०१८ |
| २१ | उमेश वसंत भोसले, मृदुला उमेश भोसले | रोशन रमेश जाधव | सदनिका नं .३०१, तिसरा मजला, जी विंग, बि नं. ४ साई इन्क्लेव्ह को. हौ .सो .लि. शिलोत्तर रायचूर | पवल १-७५३१-२०२१ | २०/०८/२०२१ |
| २२ | चंदेश जसवंतराय बोरा | शिल्पा रोहित भाटिया, राजेश मोहन भाटिया, मुकेश मोहन भाटिया | सदनिका नं .१०२, पहिला मजला, मुरलीधर को. हौ. सो., वृंदावन रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स, पालीदेवद | पवल ५-११८००-२०२१ | २४/०९/२०२१ |
| २३ | सचिन काशिनाथ म्हात्रे, रुपाली सचिन म्हात्रे | चमनलाल, अनिता देवी | सदनिका नं .२०२, दुसरा मजला, सी विंग, निंबेश्वर संस्कृती को. हौ. सो., पालीदेवद | पवल २-९०३०-२०२० | २७/१०/२०२० |
| २४ | अमित दिपक शिवदास, मयुरी अमित शिवदास | सुहास विष्णू सुर्वे, शितल सुहास सुर्वे | सदनिका नं.०३, तळ मजला, बि नं सी ३, प्रभात को. हौ. सो., पालीदेवद | पवल ४-१२०३७-२०२१ | ०१/११/२०२१ |
| २५ | पी. प्रदीप कुमार | मे. आयकॉन स्पेस डेव्हलपर्स | सदनिका नं .२०४, दुसरा मजला, बि नं ५, ई विंग, साई इन्क्लेव्ह, शिलोत्तर रायचूर | पवल ५-८२९२-२०१७ | १२/०९/२०१७ |
| २६ | महेंद्र यशवंत पालेकर | मंगेश यशवंत पालेकर | सदनिका नं .००३, तळ मजला, बी विंग, प्रयाग आंगण को ही .सो, शिलोत्तर रायचूर | पवल १-७६३-२०२२ | २०/०१/२०२२ |
| २७ | निवृत्ती पांडुरंग पाटील, संस्कृती नितीन पाटील | हेमलता भालचंद्र पाटील, संकेत भालचंद्र पाटील | सदनिका नं ई ३०२, तिसरा मजला, बि.नं. ३, कार्तिक्य पार्क को. हौ. सो., शिलोत्तर रायपूर | पवला -१४१९८-२०२१ | ११/११/२०२१ |
| २८ | मंगेश आत्माराम कांबळे, प्रमोद आत्माराम कांबळे, आत्माराम शंकर कांगळे | सोनल अजित सोनावणे, अजित बापूराव सोनावणे | सदनिका नं ए ३०१, दुसरा मजला, बि.नं. ६, साक्षी पार्क २ को. हौ. सो., शिलोत्तर रायचूर | पवल ५-४७२८-२०१९ | ०५/०५/२०१९ |
| २९ | कल्पेश कमलाकर कोटकर, मैथिली कल्पेश कोटरकर | रविंद्र बबन राऊत | सदनिका नं ०५, तळ मजला, बि.नं.सी ४, तपोवन को. हौ. सो., शिलोत्तर रायचूर | पवल ३-८०३८-२०२१ | ४/०५/२०२१ |
| ३० | सुरेखा धोंडु जाधव | स्वाती रमेश उतेकर | सदनिका नं २०३, दुसरा मजला, ए विंग, बि.नं.३, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो., शिलोत्तर रायचूर | पवल ५-१२४९५-२०२१ | ११/१०/२०२१ |
| ३१ | उत्तम मारुती वांजोळे, गीता उत्तम वांजोळे, उमेश उत्तम वांजोळ | अर्चना शानमुगा प्रियान | सदनिका नं १०६, पहिला मजला, बी विंग, सद्गुरू रेसिडेन्सी, शिलोत्तर रायचूर | पवल ३-२७९०-२०२२ | १८/०२/२०२२ |
| ३२ | साईदीप श्रीनिवास शेट्टी, साईराज श्रीनिवास शेट्टी | हेमचंद्र नामदेव दहीवदकर | सदनिका नं ०१, पहिला मजला, बि.नं ए १, साईकृपा सुकापूर को. हौ. सो. लि., पालीदेवद | पवल १-९५७-२०२२ | २५/०१/२०२२ |
| ३३ | मोहन रघुनाथ दळवी, जयश्री मोहन दळवी | महेश कुमार कुशवाहा, प्रिया मुकेश कुशवाहा | सदनिका नं ए १०४, पहिला मजला, बि. नं ३, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो. लि., शिलोत्तर रायचूर. | पवल३-१४०१५-२०२० | २९/१२/२०२० |
| ३४ | राजेश कुमार पासवान, रजनी राजेश पासवान | संजय वसंतराव ठोके | सदनिका नं १०२ पहिला मजला, ए विंग, निलांबरी को. हौ. सो. लि., शिलोत्तर रायचूर. | पवल ४-११६२२-२०१८ | ०३/१०/२०१८ |
| ३५ | नवनाथ बाबाजी जावळे, आशा नवनाथ जावळे | सुनिल रामचंद कदम, अस्मिता सुनिल कदम | सदनिका नं १०१, पहिला मजला, ए विंग, निंबेश्वर आंगण को. हौ. सो. लि., पालीदेवद. | पवल २-२४९९-२०२२ | १८/०२/२०२२ |
| ३६ | नंदा शिवाजी अनभुले | दिलखुश शिवाजी अनभुले | सदनिका नं ३०१, तिसरा मजला, सी विंग, जन्मोत्री बिल्डींग, जन्मोत्री सागर को. हौ. सो .लि., शिलोत्तर रायचूर. | पवल ५-१८०४-२०२१ | ०२/०२/२०२१ |
| ३७ | सौजन्य विनोद वनम | प्रविण जगन्नाथ पाटील | सदनिका नं ३०२, तिसरा मजला, डी विंग, बि. नं. ४, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो. लि., शिलोत्तर रायचूर. | पवल २-७१११-२०२१ | १०/०५/२०२१ |
| ३८ | शुभम जयप्रकाश शर्मा | दत्ता गोरख काळे | सदनिका नं ८, तळ मजला, बि.नं.एच ३, अवंतिका को. हौ. सो. लि., पालीदेवद. | पवल ३-९१९४-२०२१ | ०९/०६/२०२१ |
| ३९ | जयप्रकाश विजय राऊत, गौरी जयप्रकाश राऊत | विवेक नारायण पाटील, आश्लेषा विवेक पाटील | सदनिका नं २०२, दुसरा मजला, सी विंग, बि.नं.२, कार्तिक्य पार्क को. हौ.सो. लि., शिलोत्तर रायचूर. | पवल २-१७५९-२०२२ | ०४/०२/२०२२ |
| ४० | जेरोम जोस थोटियान, मेरी प्रीति जेरॉमे ठाड्डियान | शैलेश साशिकुमार नायर | सदनिका नं ००२, तळ मजला, सी विंग, बि.नं.१, गंगा धाम को. हौ. सो. लि., पालीदेवद. | पवल २-१०२९६-२०२१ | ३०/०७/२०२१ |
| ४१ | हुसेन आदम नाईक | मे .ड्रिमलॅण्ड रेसिडेन्सी तर्फे मलिक एस. वाय. | सदनिका नं १२, दुसरा मजला, अे विंग, कबीर कॉम्प्लेक्स को. हौ. सो. लि., पालीदेवद. | पवल १-०३८६८-२०१२ | २७/०३/२०१२ |
| ४२ | हरेराम नागेश्वर यादव, सुभावती हरेराम यादव | शितल सुहास सुर्वे, सुहास विष्णू सुर्वे | सदनिका नं ५, पहिला मजला, बि नं . बी ३, अविष्कार को. हौ. सो. लि., पालीदेवद. | पवल १-११९०५-२०२१ | १४/१२/२०२१ |
| ४३ | जोसी रॉबिन, रॉबिन चेपोटिककल | दिलीप खंडू चौधरी, विद्या दिलीप चौधरी | सदनिका नं ८०१, जे विंग, आठवा मजला, बालाजी सिम्फोनी, शिलोत्तर रायचूर. | पवल २-२७३९-२०२२ | २३/०२/२०२२ |
| ४४ | सिध्देश प्रविण किनरे, पूनम प्रविण किनरे | अमीर जान शेख, इम्टीयाज अमीरजान शेख | सदनिका नं बी १०२, पहिला मजला, साक्षी पार्क को. हौ. सो, पालीदेवद. | पवल १-२३०५-२०२२ | २८/०२/२०२२ |
| ४५ | गणेश पदमाकर बाजंत्री, अपर्णा गणेश बाजंत्री | जोसेफ मोहन, जोयम्मा मोहन | सदनिका नं सी २०८, दुसरा मजला, पुष्पश्री को. हौ . सो, पालीदेवद. | पवल २-६१०९-२०१४ | २५/०८/२०१४ |
| ४६ | नितिन रामनाथ वैराळकर, सिमा नितिन वैराळकर | योगेंद्रसिंग धनसिंग परमार | सदनिका नं २०६, दुसरा मजला, बी विंग, बि.नं. ई १, स्नेहकुंज को. हौ. सो. लि., पालीदेवद. | पवल २-१४०३७-२०१७ | ०७/१२/२०१७ |
| ४७ | प्रिया प्रविण अमृतसागर | गुराप्पा मुत्ताप्पा चौगुले | सदनिका नं ३ १०१, पहिला मजला, बि . नं .१, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स, शिलोत्तर रायचूर. | पवल ५-७७-२०१४ | ०३/०१/२०१४ |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# अमृता भगत ठरली पॉवर वूमन



## राज्य पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत विजेती

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील शेलू गावची रहिवासी आणि नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयाची विद्यार्थिनी अमृता ज्ञानेश्वर भगत ही महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत पॉवर वूमन ठरली. मुंबईच्या कामगार क्रीडा मैदानावर आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत अमृताने क्लासिक क्रीडा प्रकारात ज्युनियर आणि सिनियर या दोन्ही गटांत बाजी मारली आणि तिने राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपली दावेदारी निर्माण केली आहे.

जिल्हा आणि विभागीय पातळीवर पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत पॉवर वूमन ठरलेल्या अमृता हिची महाराष्ट्र राज्य स्पर्धेसाठी निवड झाली होती. ग्रामीण भागातून राज्यस्तरीय स्पर्धेत पोहचलेल्या अमृताने आपल्या कामगिरीत पुन्हा एकदा कमालीचे सातत्य दाखवले.

स्पर्धेतील आपल्या गटाचे प्रथम पारितोषिक आणि पॉवर वूमन हा बहुमान तिने मिळविला. या यशाबद्दल अमृताचे सर्वत्र कौतुक होत असून नेरळ येथील महाविद्यालयात तिचा मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला.

# दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत रायगड संघ विजेता

**धाटाव, अलिबाग : प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे झालेल्या लेदर बॉल दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत स्थानिक रत्नागिरी संघावर मात करीत रायगड संघाने विजेतेपद पटकाविले.

अंतिम सामन्यात रत्नागिरीविरुद्ध रायगडने प्रथम फलंदाजी करीत निर्धारित सहा षटकांत ५० धावा केल्या होत्या. शैलेश पाटील, सहदेव बर्डे, कल्पेश ठाकूर, हितेश पाटील व ऋषिकेश पाटील यांनी फलंदाजीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. यानंतर रायगडने भेदक गोलंदाजी करीत रत्नागिरीला ३२ धावांवर रोखून १८ धावांनी विजय मिळविला.



शैलेश पाटीलने मालिकवीराचा बहुमान पटकविला. विजयी संघात मंगेश जाधव (कर्णधार, नागोठणे), शैलेश पाटील (उपकर्णधार, अलिबाग), सहदेव बर्डे (रोहा), हितेश पाटील (अलिबाग), कल्पेश ठाकूर (नागोठणे), ऋषिकेश येशपाटिल (रोहा), संदीप दगडू ठाकूर (पांडापूर, पेण), संदीप ठाकूर (आमटेम, पेण), विलास कदम (आपटा, पनवेल), मुकेश पिंगळे (तळा), नितीन महाबळे (रोहा), शकिल उकये (म्हसळा) यांचा सहभाग होता. हा संघ साईनाथ पवार यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली तयार झाला. मंगेश दळवी संघाचे प्रशिक्षक, विजय लाड व राजेंद्र कांबळे व्यवस्थापक होते, तर उमेश भोकटे यांनी संघाला पुरस्कृत केले होते.

(छाया : अरुण नलावडे)

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा महिला संघ जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

दादरी–हरियाणा येथे १० ते १३ मार्च या कालावधीत होणाऱ्या ६८व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राने आपला संघ जाहीर केला. मुंबई उपनगरच्या कोमल देवकरच्या खांद्यावर महिला संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली आहे. परभणी येथे डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या ६८व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हा संघ निवडण्यात आला आहे.

पुण्याचे पाच खेळाडू या संघात आहेत. मुंबई उपनगरचे तीन, मुंबई शहरचे दोन, तर पालघर आणि परभणीचा प्रत्येकी एक खेळाडू या संघात आहे. हा संघ मंगळवारी (दि. ८) स्पर्धेसाठी रवाना झाला आहे.



**कोमल देवकरकडे नेतृत्व**

**असा आहे संघ**

कोमल देवकर (संघनायिका), सायली जाधव, तेजस्वी पाटेकर (तिघी मुंबई उपनगर), स्नेहल शिंदे, सायली केरीपाळे, पूजा शेलार, अंकिता जगताप, मानसी रोडे (पाचही पुणे), पूजा यादव, मेघा कदम (दोघी मुंबई शहर), पूजा पाटील (पालघर), निकिता लंगोटे (परभणी), प्रशिक्षक संजय मोकल (रायगड), व्यवस्थापिका सुजाता काळगावकर (मुंबई शहर).

# पिंच्याक सिल्याट स्पर्धेत अनुज सरनाईकला ‘सुवर्ण’

**पाली : प्रतिनिधी**

दिव–दमण येथे नुकत्याच झालेल्या तिसऱ्या वेस्ट झोन पिंच्याक सिल्याट चॅम्पियनशिप स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईक यांनी ८५ ते ९० वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले.

अंतिम सामन्यात राजस्थानच्या खेळाडूला हरवून अनुज सरनाईकने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. या यशामुळे खूप आनंद होत आहे, असे अनुजने सांगितले. अनुजला भारतीय पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर प्रकाश येवले यांचे मार्गदर्शन लाभले. यशामुळे अनुजचे सर्वत्र कौतुक होत आहे.





# क्रिकेट प्रीमियर लीगमुळे स्थानिक खेळाडूंना संधी -आमदार प्रशांत ठाकूर

**खालापूर : प्रतिनिधी**

क्रिकेट प्रीमियर लीगमुळे स्थानिक खेळाडूंना संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत आणि अशा सामन्यांचे थेट प्रेक्षपण होत असल्याने जगात कुठेही हे सामने बघणे शक्य झाले आहे, असे प्रतिपादन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते खोपोलीत आयोजित एकविरा मैत्री ग्रुप प्रीमियर लीगमध्ये बोलत होते.

खालापूर तालुक्यातील वारीला मावळमध्ये अपघात झाला होता. त्या वेळी शासकीय मदतीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदन दिले होते. झालेल्या मदतीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचा वारकरी संप्रदायाच्या वतीने या वेळी सत्कार करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी पंढरपूर वारी मार्गाचे काम चालू केले आहे, असे सांगून तरुणांना निश्चितपणाने सामाजिक जबाबदारीचे भान आहे आणि खोपोली भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते फक्त क्रिकेट सामान्यांसाठीच नाही, तर खोपोलीकरांच्या सर्व सुखदुःखात पाठीशी ठामपणे उभे असतात. खोपोली हे एक अर्थाने सर्व पद्धतीच्या कलावंतांचे, गुणवंतांचे आश्रयस्थान आहे, असे गौरवोद्गार आमदार ठाकूर यांनी काढले.

या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष व खोपोली मंडल निरीक्षक सुनील घरत, मंडल अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, उपाध्यक्ष दिलीप पवार, चिटणीस सुमिता महर्षी, युवा नेते राहुल जाधव, सूर्यकांत देशमुख, वैद्यकीय सेलचे विकास खुरपुढे, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुलकर, महिला मोर्चा जिल्हा खजिनदार रसिका शेट्टे, निता शाह, मंडल सरचिटणीस अश्विनी अत्रे, चिटणीस सीमा मोगरे आदी उपस्थित होते.

**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य अमित जाधव यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पाली देवद जि. प. विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, पं. स. विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीचे सरपंच अशोक पवार, उपसरपंच संतोष शेळके, चिखले ग्रामपंचायतीचे सरपंच नामदेव पाटील, भाजप नेते राजेश पाटील, ज्येष्ठ नेते अत्माराम पाटील, अनंता गायकवाड, माजी सरपंच गुरूनाथ भोईर, महेंद्र भोईर, कल्पेश गोजे, सादिक सैय्यद आदी उपस्थित होते.**





# श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत अक्षरचे पुनरागमन; कुलदीपला वगळले

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

डावखुरा अष्टपैलू अक्षर पटेल पायाच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरला आहे. त्यामुळे श्रीलंकेविरुद्ध बंगळुरू येथे होणाऱ्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी त्याला भारतीय संघात स्थान मिळाले आहे. अक्षरच्या समावेशासाठी मनगटी फिरकीपटू कुलदीप यादवला संघातून वगळण्यात आले आहे.

भारत–श्रीलंका यांच्यात १२ मार्चपासून सुरू होणारी दुसरी कसोटी गुलाबी चेंडूने प्रकाशझोतात खेळवण्यात येईल. भारताने पहिल्या कसोटीत श्रीलंकेचा एक डाव आणि २२२ धावांनी धुव्वा उडवला. रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन या जोडीने भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. तिसरा फिरकीपटू जयंत यादवला फारशी गोलंदाजी करण्याची संधीही मिळाली नाही.





अक्षरला पायाच्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिका दौऱ्याला मुकावे लागले. त्यानंतर कोरोनाची लागण झाल्यामुळे त्याचे पुनरागमन लांबले. दुसरीकडे कुलदीप फेब्रुवारी २०२१मध्ये अखेरची कसोटी खेळला आहे. दुसऱ्या कसोटीसाठी अक्षरचा जयंत यादवच्या जागी मुख्य संघात समावेश करण्यात येईल. गतवर्षी इंग्लंडविरुद्ध फेब्रुवारीत झालेल्या प्रकाशझोतातील कसोटीत अक्षरने तब्बल ११ बळी मिळवले होते.

# आरसीबीला लवकरच मिळणार नवा कर्णधार

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचा १५वा हंगाम येत्या २६ मार्चपासून सुरू होतोय. या वेळी सर्वच संघात थोडेफार बदल करण्यात आले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघामध्ये तर मोठा फेरबदल करण्यात आलाय. लवकरच आरसीबीला नवा कर्णधार मिळणार आहे.

विराटने आयपीएल २०२१ नंतर संघाचे कर्णधारपद सोडलेले असून आरसीबी आपला पहिला सामना २७ मार्च रोजी पंजाबविरुद्ध खेळणार आहे. या अगोदर संघाचा कर्णधार निश्चित करणे गरजेचे आहे. याच कारणामुळे दक्षिण आफ्रिकन खेळाडू डू प्लेसिसचे नाव कर्णधार म्हणून निवडण्यात आलेय. येत्या १२ मार्चला आरसीबीने पत्रकार परिषदेचे आयोजन केले असून यामध्ये कर्णधार म्हणून प्लेसिसचे नाव जाहीर केले जाणार आहे.





**पनवेल : जागतिक महिला दिनानिमित्त पनवेल भाजपच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, शांताराम पाटील, मयूर कदम, महेंद्र गोजे, माजी नगरसेविका नीता माळी, वर्षा नाईक, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, उपाध्यक्ष लीना पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.**

# वॉर्नच्या पार्थिवावर एमसीजी मैदानावर होणार अंत्यसंस्कार

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा माजी फिरकीपटू शेन वॉर्नच्या पार्थिवावर मेलबर्न क्रिकेट मैदानावर (एमसीजी) शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. थायलंडमधील कोह सामुई येथून वॉर्नचे पार्थिव अजून मेलबर्न येथे परतले नसल्याने त्याच्या कुटुंबीयांनी अंतिम संस्कारासाठी तारीख निश्चित केलेली नाही.



एका ऑस्ट्रेलियन वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, येत्या दोन किंवा तीन आठवड्यांच्या कालावधीत वॉर्नवर ‘एमसीजी’ येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्याला अखेरचा निरोप देण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित असतील.

मेलबर्नमध्ये जन्मलेल्या वॉर्नचे ‘एमसीजी’ हे सर्वात आवडते मैदान होते. याच मैदानावर त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ७०० बळींचा टप्पा गाठला होता. ‘एमसीजी’बाहेर वॉर्नचा पुतळा उभारण्यात आला असून लवकरच एका स्टॅण्डलाही त्याचे नाव देण्यात येणार आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com